महाराष्ट्र शासन
वन विभाग

**उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचे कार्यालय**

(नविन प्रशासकिय इमारत (वनभवन), शासकिय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल्स, नागपूर 440 001.)

(Land Line No - 0712-2565624, Email-id : dyefnagpur@mahaforest.gov.in)

कक्ष-1/आस्था-अ/बदलीसत्र-24/वनरक्षक/अंशता बदल/2024-25/2236 दिनांक : 09.10.2024

**आदेश -**

विषय – बदलीसत्र-2024
वनरक्षक गट-क संवर्गातील विभागाअंतर्गत बदली झालेल्या कर्मचाऱ्याचे पदस्थापनेत अंशता बदल करणे बाबत.

संदर्भ – 1) या कार्यालयाचे विभागाअंतर्गत बदली आदेश क्र. कक्ष-1/आस्था-अ/बदलीसत्र-2024/प्र.क्र./2024-25 /1828 दि. 31 ऑगस्ट 2024
2) दिनांक 31 ऑगस्ट 2024 रोजी आयोजित नागरी सेवा मंडळाची बैठक.
3) दिनांक 13 सप्टेंबर 2024 रोजी आयोजित नागरी सेवा मंडळाची चक्राकार बैठक.
4) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-1/आस्थ-अ/बदलीसत्र-24/अंशता बदल/2024-25/747 दि. 13.09.2024
5) वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-1/आस्था-अ/विनंती बदली/प्र.क्र.326/24-25/2454 दिनांक 09 ऑक्टोंबर 2024

बदलीसत्र-2024 अंतर्गत नागपूर वन विभागातील 'वनरक्षक' गट-क संवर्गातील कर्मचाऱ्याच्या विभागाअंतर्गत बदल्या संदर्भात दि. 31.08.2024 रोजी नागरी सेवा मंडळाची बैठक पार पडली. उक्त बैठकित नागरी सेवा मंडळाने केलेल्या शिफारशी व बदली अधिनियम-2005 मधिल तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक : एफएसटी-12/17/प्र.क्र.664/फ-4, दि. 11.01.2018 अन्वये प्राप्त शक्तीचा वापर करून वनरक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांचे विभागाअंतर्गत बदलीने पदस्थापनेचे आदेश संदर्भ क्र. 1 अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

2.0 सदर बदली प्रक्रिया दि. 30 व 31 ऑगस्ट 2024 या दोन दिवसात अंत्यत कमी वेळात, मर्यादित कालावधीत पुर्ण करणे आवश्यक असल्याने बदलीपात्र वनरक्षकांचे विनंती अर्ज व सुधारीत पसंतीक्रम, वन्यजीव विभागात कार्यरत वनरक्षकांचे कार्यरत पदावर 1 वर्ष मुदतवाढ मिळणेबाबतचे अर्ज, पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत बदलीचे विनंती अर्ज संबधित नियंत्रक अधिकारी यांचे कार्यालयाकडून वेळीच प्राप्त झाले नाही, तसेच काही वनरक्षकांना वेळीच पसंतीक्रम सादर करणे शक्य झाले नाही, याशिवाय संदर्भ क्र. 1 चे बदली आदेशानुसार बदलीने पदस्थापना झालेल्या वनरक्षकांपैकी निवडक वनरक्षकांनी त्यांनी विवरणपत्र-1 मध्ये दिलेल्या 10 पसंतीक्रमापैकी एका पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आली नसल्यामुळे, त्याचप्रमाणे कुटुंबातील सदस्यांचे गंभीर आजार, कौटुंबिक, वैयक्तीक व इतर कारणास्तव व मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, नागपूर खंडपिठ यांनी दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने बदलीने पदस्थापनेचे ठीकाणात अंशता बदल करून रिक्त असलेल्या पदावर किंवा अंशता बदलाने रिक्त होणाऱ्या पदावर पदस्थापना करण्याबाबत प्राप्त विनंती अर्जाचे अनुषंगाने सक्षम प्राधिकारी यांना शिफारस करणेस्तव नागरी सेवा मंडळाची चक्राकार बैठक दि. 13.09.2024 आयोजित करण्यात आली.

3.0 सदर नागरी सेवा मंडळाचे बैठकित दिनांक 09 एप्रिल, 2018 चे शासन निर्णयातील परिशिष्ट-1 सोबतचे विवरणपत्र-1 मध्ये कर्मचाऱ्यांनी सादर केलेले त्यांचे बदलीबाबतचे पसंतीक्रम, प्राधान्यक्रमानुसार त्यांचे विनंती अर्ज व त्यासोबत सादर केलेले सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, संबंधित कर्मचाऱ्यांचा मागील 10 वर्षाचा सेवा तपशिल, कर्मचाऱ्यांचे वय व सेवा निवृत्ती करीता शिल्लक कालावधी, संबंधित संवर्गात शाखानिहाय झालेला पदावधी, कर्मचाऱ्यांचे निवेदन, प्रादेशिक शाखा, वन्यजीव शाखा, सामाजिक वनीकरण विभाग, इतर शाखा अंतर्गत रिक्त व बदलीपात्र पदांची उपलब्धता, कर्मचाऱ्यांची उपयुक्तता, रिक्त पदे असलेल्या कार्यालय/शाखेत कामाची निकड इत्यादी बाबी, शासन निर्णयातील समुपदेशनाचे धोरणानुसार संदर्भ क्र. 1 चे बदली आदेशान्वये बदलीने पदस्थापना करण्यात आलेल्या वनरक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांनी त्यांचे बदलीने पदस्थापनेचे ठीकाणात अंशता बदल करण्याकरीता सादर केलेल्या विनंती अर्जाचा तपशिल नागरी सेवा मंडळासमोर ठेवण्यात आला.

उपवनसंरक्षक नागपूर
नागपूर वन विभाग, नागपूर

Scanned with OKEN Scanner

4.0 त्याअनुषंगाने नागरी सेवा मंडळाने उक्त बैठकित अंशता बदल करण्याबाबत प्राप्त विनंती अर्जावर विचार करून बदलीने पदस्थापनेच्या ठीकाणात अंशता बदल करण्याबाबतचा प्रस्ताव सक्षम प्रधिकारी यांचे मंजुरीस्तव संदर्भ क्र. 4 अन्वये नागरी सेवा मंडळाचे शिफारशीसह सादर करण्यात आला. सादर करण्यात आलेल्या सदर प्रस्तावास वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे कार्यालयाव्दारे संदर्भ क्र. 5 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

करीता बदलीचे ठीकाणात अंशता बदल करण्याबाबत वनरक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांचे विनंती अर्जाचे अनुषंगाने प्राप्त मान्यते नुसार वनरक्षकांचे बदलीने पदस्थापनेत अंशता बदल करून खालील प्रमाणे सुधारीत बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | वनरक्षकाचे नांव (सर्वश्री) | कार्यरत पदनाम | पुर्वीचे पदस्थापनेचे ठिकाण | सुधारीत पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शुभम कैलास पवार | वनरक्षक, खापा, देवलापार (वन्यजीव) वनपरिक्षेत्र, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर | वनरक्षक, सालेभट्टी, दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, खापा, देवलापार (वन्यजीव) वनपरिक्षेत्र, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर | विनंती नुसार कार्यरत पदावर 1 वर्ष मुदतवाढ |
| 2 | कु. प्रिया मारोतराव घटी | वनरक्षक, कळमना-2, सेमिनेरी हिल्स वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, आदासा, कळमेश्वर वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, रेस्क्यू सेंटर, सेमिनेरी हिल्स, नागपूर वनविभाग | विनंती नुसार |
| 3 | रामेश्वर विश्वनाथ पांचाळ, | वनरक्षक, मृगविहार, सेमिनेरी हिल्स वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, खैरी, कळमेश्वर वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, तपासणी नाका कामठी, सेमिनेरी हिल्स वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | विनंती नुसार |
| 4 | हेमराज सुभाष कापडे | वनरक्षक, आय.सी.डी. अजनी, सेमिनेरी हिल्स वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, खापा, देवलापार (वन्यजीव) वनपरिक्षेत्र, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर | वनरक्षक, सालेभट्टी, दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्र, नागपूर वन विभाग | विनंती नुसार |
| 5 | कु. सुरेखा मनोहर वैद्य, | वनरक्षक, सालेभट्टी, दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, कऱ्हांडला पर्यटन गेट, उमरेड (व.जी.) वनपरिक्षेत्र, उमरेड-पवनी-कऱ्हांडला, पें.व्या.प्र. नागपूर | वनरक्षक, पवनी पर्यटन गेट, पवनी (व.जी.) वनपरिक्षेत्र, उमरेड-पवनी-कऱ्हांडला, पें.व्या.प्र. नागपूर | संदर्भ क्र. 1 चे आदेश कायम |
| 6 | राहूल एस. हुलकाने | वनरक्षक, मुरली, कोंढाळी वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, हेटीखेडा, नागलवाडी (वन्यजीव) वनपरिक्षेत्र, पेंच व्या. प्र. नागपूर | वनरक्षक, आदासा, कळमेश्वर वनपरिक्षेत्र, नागपूर वनभिाग | विनंती नुसार |
| 7 | कु. सोनाली प्रकाश खांडकुळे, | वनरक्षक, तपासणी नाका सावनेर, खापा वनपरिक्षेत्र, नागपूर | वनरक्षक, रानाई, पवनी (वन्यजीव) वनपरिक्षेत्र, उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्य, पें.व्या.प्र. नागपूर | वनरक्षक, चांपा, उत्तर उमरेड वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | विनंती नुसार |
| 8 | पंकज गणपतराव लामसे, | वनरक्षक, कोरमेटा, खापा वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, आमघाट-1, बुटीबोरी वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, खैरी, कळमेश्वर वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | विनंती नुसार |

उपवनसंरक्षक नागपूर
नागपूर वन विभाग, नागपूर

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | वनरक्षकाचे नांव (सर्वश्री) | कार्यरत पदनाम | पुर्वीचे पदस्थापनेचे ठिकाण | सुधारीत पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 9 | नितीन पी. चनकापुरे, | वनरक्षक, खैरी, कळमेश्वर वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, भागीमाहीरी, पारशिवणी वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, टेंभुरडोह, खापा वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | विनंती नुसार |
| 10 | कु. सुनिता विनायक नागरगोजे | वनरक्षक, बुटीबोरी, बुटीबोरी वनपरिक्षेत्र नागपूर वनविभाग | वनरक्षक, तपासणी नाका कामठी, सेमिनेरी हिल्स वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, पिपळा, नरखेड वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | विनंती नुसार |
| 11 | मारोती त्र्यंबकराव मुंडे | वनरक्षक, तपासणी नाका, बुटीबोरी (प्रा) वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, टेंभुरडोह, खापा (प्रा) वनपरिक्षेत्र, नागपूर वन विभाग | वनरक्षक, सारडी, नरखेड वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | विनंती नुसार |
| 12 | नरेंद्र बलदेव धाबर्डे | वनरक्षक, अवैध शिकार प्रतिबंधक कक्ष, उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालय | वनरक्षक, शेडेश्वर, बुटीबोरी वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, अडेगांव, कवडस बफर (वन्यजीव) वनपरिक्षेत्र, बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा | विनंती नुसार |
| 13 | कु. अनुराधा किशोर राऊत, | वनरक्षक, उटी, उत्तर उमरेड वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, मांडवा, दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, आमघाट-1, बुटीबोरी (प्रा) वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | विनंती नुसार |
| 14 | शंकर परमेश्वर गिते | वनरक्षक, सोनखांब, काटोल वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | वनरक्षक, रेस्क्यू सेंटर, सेमिनेरी हिल्स, नागपूर वनविभाग | वनरक्षक, लोहारा-2, उत्तर उमरेड वनपरिक्षेत्र, नागपूर वनविभाग | विनंती नुसार |

5.0 सदर आदेश तात्काळ अंमलात येतील. उपरोक्त कर्मचाऱ्यांनी त्यांचे अंशता बदलीने पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होण्यास तातडीने कार्यमुक्त व्हावेत.

6.0 कार्यरत पदावर 1 वर्षाची मुदतवाढ देण्यात येत असलेले कर्मचारी हे पुढील बदलीसत्रात बदलीकरीता पात्र राहतील.

7.0 संबधित नियंत्रण अधिकारी (सर्व) यांनी उपरोक्त कर्मचाऱ्यांना त्यांचे सुधारीत बदली व पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होणेस्तव तात्काळ स्थानिक व्यवस्थेने कार्यमुक्त करावे.

उपवनसंरक्षक नागपूर ★ नागपूर वन विभाग, नागपूर ★ सत्यमेव जयते

(डॉ. भारत सिंह हाडा)
उपवनसंरक्षक
नागपूर वनविभाग, नागपूर

प्रति,

वरील प्रमाणे सर्व 14 वनरक्षक
(मार्फत : संबधित नियंत्रक अधिकारी)

प्रतिलीपी : वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांना माहीती करीता सहिवनय सादर.

प्रतिलीपी : उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

प्रतिलीपी : उपसंचालक, बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा यांना माहीती व आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित.

प्रतिलीपी : वनपरिक्षेत्र अधिकारी (सर्व), नागपूर वनविभाग यांना माहीती व आवश्यक कार्यवाही करीता रवाना.

Scanned with OKEN Scanner